स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे
**कला व वाणिज्य महाविद्यालय**
दोडी बु।।, ता. सिन्नर, जि. नाशिक ☎: ०२५५१ - २९९९८७
महा. शासन मान्यता क्र.: एनजीसी २००३/नमवि/(१/०३)/माशि-३ दि. १५/७/२००३
पुणे विद्यापीठ संलग्न क्रमांक : (ID No. PU/NS/AC/74/2003) web- www.dodicolleg.org
E-Mail-ID-artsandcommercecollege_dodibk@rediffmail.com AISHE Code C 42105

AISHE CODE – C42105 Pun Code - CAAN017900 College Code 0731

6.2.1: The institutional perspective plan is effectively deployed and functioning of the institutional bodies is effective and efficient as visible from policies, administrative setup, appointment, service rules, and procedures, etc

| SR. NO. | TITLE OF THE DOCUMENT |
|---|---|
| 1 | Organogram of the institute |
| 2 | list of committees |
| 3 | Constitution of Shri Brahmanand Swami Shikshan Prasarak Mandals Dodi BK |

S.B.S.S.P.M. Arts and Commerce Collage, Dodi Bk.II ★ Tal. - Sinnar, Dist. Nashik ★ OFFICE

श्री ब्रह्मानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय

दोडी बु।।, ता. सिन्नर, जि. नाशिक ☎: ०२५५१ - २९...

महा. शासन मान्यता क्र.: एनजीसी २००३/नमवि/(१/०३)/माशि-३ दि. १५/७/२००३

पुणे विद्यापीठ संलग्न क्रमांक : (ID No. PU/NS/AC/74/2003) web- www.dodicolleg.org

E-Mail-ID-artsandcommercecollege_dodibk@rediffmail.com AISHE Code C 42105

S.B.S.S.P.M. Arts and Commerce Collage, Dodi Bk.II Tal. Sinnar, Dist. Nashik OFFICE

**AISHE CODE – C42105** **Pun Code - CAAN017900** **College Code 0731**

## ACADEMIC COMMITTEES 2021 - 2022

| S.No | Name of Committee |
|---|---|
| 1. | *College Development Committee* |
| 2 | *Admission Committee* |
| 3. | *Institutional Academic Calendar Committee* |
| 4. | *Time Table Committee* |
| 5. | *Examination Committee* |
| 6. | *Research and Innovation Committee* |
| 7. | *Competitive examination Committee* |
| 8 | *Anti ragging and Grievance Redressed Cell* |
| 9. | *Publicity and College Magazine Public Relation / Website /News Committee* |
| 10. | *Teacher and Student Feedback Committee* |
| 11. | *Students Development committee* |
| 12. | *Internal Quality Assurance Cell (IQAC)* |
| 13. | *Industrial Tours Committee* |
| 14 | *Attendance Committee* |
| 15. | *Environmental awareness* |
| 16. | *Gymkhana committee* |
| 17. | *Vangmay Mandal* |
| 18. | *N. S. S.* |
| 19 | *Staff welfare Committee* |
| 20 | *Cultural activities* |
| 21 | *Library Committee* |
| 22 | *Scholarship Committee* |
| 23 | *Short Term Add On Course Committe* |
| 24 | *Mentoring Cell* |
| 25 | *Right to Information Act* |
| 26 | *Soft Skills Development* |
| 27 | *Women Grivences Redressal Cell* |
| 28 | *Discipline Committee* |

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


र. नं. महा./१२६/ नाशिक
दि. १७-९-१९७९

र. नं. महा. एफ. /४९५/ नाशिक
दि. ३१/३/१९८०

SHREE BRAMHANAND SWAMI SHIKSHAN PRASARAK MANDAL

श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळ,

दोडी बु ।।, ता. सिन्नर, जि. नाशिक, ☎ : (०२५५१) २६१५२१


# Guarantee

Shri Brahmananda Swami Shikshan Prasarak Mandal Dodi Bu.., T. Sinnar, Distt. Our organization Nashik is registered on 17/09/1979 with Charity Commissioner Office Nashik Maharashtra. At the time of this registration, Charity Commissioner So. Has given legal recognition to the constitution of our organization in Marathi language. The office bearers of the institution, the members of the institution and the various secondary schools, junior colleges and senior colleges run under the institution implement the provisions of the constitution of the institution as per the rules of the government.

चिटणीस
श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळ
दोडी बु ।।, ता. सिन्नर, जि. नाशिक

[Spl—CO BPT.2

№ 01639

## नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) यान्वये नासिक विभाग नासिक येथील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था-नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आली आहे.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे नाव "श्री कान्हानंदस्वामी शिक्षण प्रसारक मंडळ" दोडी, ता. सिन्नर जि. नासिक

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक [illegible] - ४५५ (नासिक)

श्री दादा गणपत केदार यास प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक ३१-३-१९८० माझ्या सहीनिशी दिले.

अ. ट. कदम

सहायक धर्मादाय आयुक्त

नासिक प्रदेश नासिक.

सहायक धर्मादाय आयुक्त शिक्का नासिक प्रदेश, नासिक

ATTESTED

PRINCIPAL

ARTS & COMMERCE COLLAGE

Dodi Bk.II, Tal. Sinnar, Dist. Nashik

# -: घटना :-

नाव :- श्री. ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळ.

स्थळ :- मु. पो. दोडी ( बुद्रुक ) ता. सिन्नर जि. नाशिक.

सभासदत्व :- १) सर्वसाधारण सभा २) विश्वस्त मंडळ.

१) २१ वर्षांवरील कोणाही स्त्री-पुरुषांस संस्थेचे सभासद होता येईल त्यासाठी त्या व्यक्तीने सभासदत्वाचा अर्ज वर्गणीसह विश्वस्त मंडळास सादर केला पाहिजे. हा अर्ज विश्वस्त मंडळाने मंजूर केल्याशिवाय त्यास संस्थेचा सभासद समजले जाणार नाही.

२) प्रत्येक सभासदाने आपली वार्षिक वर्गणी ३१ मार्च पर्यंत भरली - पाहिजे. वरील मुदतीत वर्गणी न भरल्यास पुढील वर्षाच्या कोणत्याही सभेमध्ये भाग घेता येणार नाही. व चर्चा करता येणार नाही.

३) संस्थेच्या कोणत्याही वर्गाच्या सभासदाचे वर्तन मंडळाच्या ध्येय - धोरणाविरुध्द आहे असे आढळून आल्यास अगर सदरचा सभासद अन्य दृष्टी मंडळाचा सभासद राहण्यास पात्र नाही असे वाटल्यास विश्वस्त मंडळ त्याची वर्गणी परत न करता त्याचे सभासदत्व रद्द करू शकेल. मात्र अशा सभासदाविरुध्द कारवाई करण्यापूर्वी त्यास नोटीस देऊन त्याचे म्हणणे - ऐकून घेण्यास त्यास पुर्णपणे संधी देण्यात येईल. क्रमाने ६ सभांना पुर्व परवानगी न घेता सभासद गैरहजर राहिल्यास त्याचे सभासदत्व रद्द होईल.

४) सभासदांचे वर्ग :-

सभासदाचे वर्ग खालील प्रमाणे राहतील.

१) हितचिंतक :- रु. १०००-०० किंवा त्यापेक्षा जा एकत्र वेळी भरेल त्यास.

२) आजिव सभासद :- रु. ५००-०० किंवा त्यापेक्षा जा एकत्र वेळी भरेल त्यास.

३) सामान्य सभासद :- रु. ५१-०० किंवा त्यापेक्षा जास्त

४) ऑनररी सभासद :- वाङ्‌मयीन, शैक्षणिक व सामाजिक कार्य केलेल्या इसमास त्यांच्या अनुभवाचा फायदा संस्थेस मिळण्याच्या दृष्टीने त्यास विश्वस्त मंडळाने मान्यता दिल्यास त्यास " ऑ. सभासद " समजण्यात येईल. परंतु त्यास मतदानाचा अधिकार राहणार नाही.

५) हितचिंतक, आजिव सभासद यांना कायम स्वरूपाचा मतदानाचा हक्क राहील. सामान्य सभासदास सलगपणे ५ वर्षे फी (सभासदत्वाची) - भरल्यास मतदानाचा हक्क मिळेल.

पान..२..वर..

अर्ज क्र. F 884 / 2552/12
अर्जदाराचे नाव
नक्कल सेवा शुल्क रुपये: 150
भरण्याचा दिनांक
नक्कल अर्ज मिळाल्याचा दि. 10/12/12
नक्कल दिल्याचा दि. 24/12/12
नक्कल तयार करणार
नक्कल रुजायत करणार
सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग नाशिक

४) <u>सर्व साधारण सभा :-</u>

अ) (१) सर्व साधारण सभा - हितचिंतक, आजिव सभासद, आश्रयदाते व ओ. सभासदांची मिळून होईल. तिची बैठक वर्षातून एकदा घेतली जाईल.

(२) सर्व साधारण सभेची खास बैठक जरूर पडल्यास अध्यक्ष, चिटणीस हे विश्वस्तांच्या सल्ल्याने बोलवू शकतील. किंवा मताधिकार असलेल्या सभासदांपैकी $\frac{1}{2}$ अगर त्यापेक्षा जास्त सभासदांनी अशी मागणी केल्यास खास सर्वसाधारण सभा अध्यक्ष बोलवतील. सभेचा अजेंडा १० दिवस अगोदर काढला जाईल.

(३) खास सर्व साधारण सभेची गणसंख्या $\frac{1}{2}$ राहिल. कोरमच्या अभावी तहकुब झालेली सभा ७ दिवसानंतर भरविण्यात येईल. सभा तहकुब झालेल्या सभेस कोरमची जरुरी नाही.

ब) <u>कामे व अधिकार :-</u>

(१) सर्व साधारण सभेचे कामकाज संस्थेचे अध्यक्ष पाहतील. त्यांच्या गैरहजरीत उपाध्यक्ष काम पाहतील. दोघांचे गैरहजरीत ही सभा आपल्या सभासदांकडून अध्यक्ष निवडतील व हा अध्यक्ष फक्त त्या सभेचे काम पाहिल.

(२) मंडळाच्या कार्यासंबंधी स्थूल आढावा घेणे व पुढील धोरण ठरविणे.

(३) हिशोब - ताळेबंद, अंदाज पत्रके व वार्षिक अहवाल मंजूर करणे

(४) विश्वस्त मंडळाने मंजुरीसाठी ठेवलेले विषय, ठराव अगर व्यवहार यांना मंजुरी देणे.

(५) विश्वस्त मंडळाची निवड करणे.

५) <u>विश्वस्त मंडळ :-</u>

(१) विश्वस्त मंडळाची मुदत ५ वर्षे राहील.

(२) विश्वस्त मंडळात - अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, सह-चिटणीस, खजिनदार व सभासद राहिल. एकूण विश्वस्तांची संख्या १५ राहील. सदरची निवड अंतर्गत विश्वस्तामार्फत होईल.

(३) अध्यक्ष, उपाध्यक्ष चिटणीस हे हितचिंतक किंवाआजिव सभासदांपैकी असतील.

(४) विश्वस्त मंडळास १ सभासद स्वीकृत करण्याचा अधिकार राहील.

<u>कामे व अधिकार :-</u>

पान ३ वर

(१) विश्वस्त मंडळाची सभा दरमहा भरेल. सभेची सूचना १० दिवस अगोदर दिली जाईल. जरूर पडल्यास अध्यक्ष केव्हाही सभा बोलावू शकतील.

(२) विश्वस्त मंडळाचे कमीत कमी ३ सभासद हजर असल्याशिवाय कामकाज चालणार नाही.

(३) मंडळाच्या व तिच्या इतर शाखांचे हिशोब तपासणीचे (Auditor) नेमणूक करणे.

(४) निरनिराळ्या कामासाठी सब- कमिट्या नेमणे.

(५) जरूर पडल्यास मंडळाचे म्हणणे मांडण्यासाठी शिष्टमंडळ पाठविण्यास परवानगी देणे.

\\ (६) विश्वस्त मंडळातील एखादी जागा अन्य कारणाने रिकामी झाल्यास ती भरली जाईपर्यंत काम पाहणेस सदरची जागा विश्वस्त सर्वानुमते भरतील.

(७) चिटणीसाने सादर केलेले अंदाजपत्रक जरूर तर दुरुस्तीसह अगर तसेच मंजूर करणे.

(८) एखादे प्रकरण उपस्थित झाल्यास न्यायालयात कोर्टात काम चालविणे अगर बचाव करणेसाठी विश्वस्त मंडळाने मान्यता दिलेल्या सभासदास काम पाहता येईल.

(९) शिल्लकेतून योग्य वाटेल ती रक्कम कायम निधी मध्ये गुंतविणे झाल्या मंडळाचे सल्ल्याने निर्णय घेता येईल.

(१०) वार्षिक अहवाल व हिशोब प्रसिद्ध करणे.

(११) संस्थेच्या शाखा प्रमुखाकडून आलेल्या प्रकरणाचा विचार करणे व - त्यांचा योग्य निकाल लावणे.

(१२) मंडळाच्या नविन शाखा उघडणे व दुसऱ्या संस्था संलग्न करून घेणे मंडळाकरीता स्थावर मालमत्ता खरेदी करणे, विकणे, गहाण टाकणे, भाड्डे पट्ट्याने देणे अगर घेणे, कर्ज उभारणे, कर्जाऊन पैसे देणे व मंडळासाठी फंड - उभारणे, इमारती बांधणे.

(१३) मंडळाच्या सर्व शाखांचे हिशोब तपासून मंजूर करणे. त्यात चूक असल्यास दुरुस्ती करणे. ताळेबंद, अंदाजपत्रक व अहवाल मंजूर करणे व वार्षिक सर्व साधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवणे.

(१४) मंडळाचा व शाखांचा निधी व मालमत्ता यांची चांगली व्यवस्था ठेवणे.

(१५) मंडळाचे सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीचे सभासदास मंजुरी देणे अगर मंजुरी न देणे.

(१६) मंडळाचे ध्येय धोरणानुसार योजना आखून राबविणे, बँकेकडून घेण्यात येणाऱ्या कर्जासाठी आवश्यक ती मंडळाची स्थावर मालमत्ता तारण म्हणून देणे व आवश्यक त्या कागदपत्रावर अध्यक्ष व चिटणीस सह्या करतील.

पान .. -

६. (अ) अध्यक्ष :-

(१) सर्व साधारण सभेचे व विश्वस्त मंडळाच्या सभा बोलविणे.

(२) सभेच्या तारखा, वेळ, ठिकाण निश्चित करणे.

(३) विश्वस्तांच्या कामकाजावर देखरेख ठेवणे.

(४) विश्वस्तांनी मंजूर केलेला राजीनामा स्विकारणे व सर्वसाधारण सभेत मंजूर झालेले राजीनामा स्विकारणे.

(ब) उपाध्यक्ष :-

अध्यक्षांचे गैरहजेरीत काम करतील.

(क) चिटणीस :-

(१) सर्व साधारण सभा व विश्वस्त मंडळ यांचे चिटणीस म्हणून काम पाहतील.

(२) संस्थेचे दप्तर, स्थावर मिळकतीचे कागदपत्र, ठेवी इ. ताब्यात ठेवणे.

(३) संस्थेचा पत्रव्यवहार करणे. सभेचा वृत्तांत लिहिणे व वाचणे. संस्थेचा जमा-खर्च लिहिणे.

(४) विश्वस्त ठरवतील त्या प्रमाणे इतर सर्व कामे करणे.

(ड) सह-चिटणीस :- चिटणीसांच्या गैरहजेरीत काम करतील.

(इ) खजिनदार :-

(१) मंडळाच्या कामासाठी स्वतःजवळ तातडीच्या खर्चासाठी रु. ५०-०० ठेवणे.

(२) हिशोबाची माहिती ठेवणे. व विश्वस्त मंडळ ठरविल त्या प्रमाणे आर्थिक कामे करणे.

७. सभेचे कामकाज :-

(१) एखाद्या ठरावावर सारखीच मते पडल्यास सभेच्या अध्यक्षांना एक निर्णायक मत देता येईल.

(२) सभेचे काम सुरू होण्यापूर्वी अध्यक्षांचे परवानगीने जरूर तितके जादा विषय घेता येतील.

(३) कोरम करिता अर्धा तास वाट पाहिली जाईल - व त्या मुदतीत कोरम न झाल्यास अध्यक्ष सभा तहकूब करतील.

(४) वेळेच्या अभावी सभा तहकूब झाल्यास ती दुसऱ्या दिवशी घेता येईल. तिची वेळ, ठिकाण त्याच वेळी जाहिर करण्यात येईल. अशा सभेस कोरमची जरूरी राहणार नाही.

(५) तहकुबीची सूचना केव्हाही आणता येईल. व ती पास झाल्यास मिटींगचे काम बंद करता येईल.

(६) कोणत्याही ठरावावर एक अगर अनेक उप-सूचना मांडता येतील. मात्र त्या मूळ ठरावाच्या विरुध्द असू नये.

पान...५.वर...

८. सभेसाठी आवश्यक कोरम :-

(१) कोणत्याही सभेसाठी $\frac{1}{2}$ किंवा त्यापेक्षा जास्त संख्या कोरम म्हणून धरण्यांत येईल.

(२) सर्वसाधारण सभेसाठी रजिस्टरमध्ये नोंदलेल्या सभासदांच्या संख्येच्या $\frac{1}{3}$ सभासद ही कोरम संख्या म्हणून धरण्यांत येईल.

९. सर्वसाधारण सभा, विश्वस्तांच्या सभेचे इतिवृत्त, प्रोसिडींग दप्तर ठेवणेबाबत

(१) प्रत्येक सभेच्या कामकाजाचे प्रोसिडींग लिहिणे.

(२) सभा बोलाविण्यांत आल्यानंतर सभासदांची सही घेतलेली अ(अजेंडा मिळाल्या बद्दल ) प्रत तसेच ज्या मुद्यावर निर्णय घेण्यांत आले अशा - अजेंड्याची प्रत ठेवणे.

(३) मागील सभेचे प्रोसिडींग ( इतिवृत्त ) सभेत कायम करतांना जर काही मतभेद झाले तर असे इतिवृत्त सभेस हजर असलेल्या सभासदांच्या बहुमताच्या निर्णयाने मंजुर करण्यांत यावे. सभेचे प्रोसिडींग वाचतांना जर सर्व सभासदांना मान्य झाले तर ते चेअरमनच्या सहीने कायम करणे

१०. दुरुस्ती व बांधकाम :-

संस्थेस दुरुस्ती, नवीन बांधकाम करावयाचे असेल व ते काम रु. ५००० पेक्षा जास्त असेल तर त्यासाठी टेंडर मागविता येईल. अगर ते काम खात्यामार्फत ( Departmentaly ) करता येईल.

११. जमाखर्च : व बँक हिशेब :-

(१) मुंबई पब्लीक ट्रस्ट अॅक्ट १९५० नुसार ट्रस्टीने आपला नियमित उत्पन्नाचा व स्थावर मालमत्तेचा जमा-खर्च ठेवला पाहिजे. सदरचा जमा खर्च ऑडीटरकडून ऑडीट करुन त्याची प्रत ऑफि. चॅरीटी कमिशनर, नासिक विभाग नासिक यांचे दप्तरी पाठविली पाहिजे.

(२) ट्रस्टीने आपल्या हातात रु. ५००-० पेक्षा जास्त रक्कम ठेऊ नये.

(३) मंडळाच्या इतर शासीत विश्वस्त मंडळ नोकरांच्या नेमणूका करणे, वेतनश्रेणी ठरविणे, बदली करणे, बढती देणे, कायम करणे, व कारनामे करुन घेणे, त्यांच्या नौकरीची मुदत वाढविणे नोकरी बंद करणे, नौकरीतून कमी करणे व त्यांचे राजीनामे स्विकारणे, किरकोळ रजेशिवाय इतर रजा मंजुर अगर ना मंजुर करणे.

(४) नोकरांच्या नेमणूक पत्रावर व इतर कागदपत्रांवर अध्यक्षांच्या सह्या राहतील.

१२. विश्वस्तांची निवड :-

पान...६..वर...

(१) खास सर्व साधारण सभेत प्रत्येक ५ वर्षांनी विश्वस्त मंडळाची निवड केली जाईल.

(२) मंडळाचे चिटणीस १ महिने अगोदर सूचना फलकावर (अधिनियम मधील) निवडणुकीची नोटीस लावून इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागवतील. नोटीस लावल्यापासून १ आठवड्याच्या आत इच्छुक उमेदवाराचे अर्ज स्विकारले जातील. सदरचा अर्ज परिशिष्ट 'ब' मध्ये दिलेल्या नमुन्यात दिलेला असून अर्जाबरोबर रु. 700/- फी भरावी. सदरची फी परत मिळणार नाही. मुदतीनंतर आलेले अर्जाचा विचार होणार नाही.

(३) उमेदवारांच्या अर्जांची छाननी विश्वस्त मंडळ करून त्या बाबत त्यांचा निर्णय अखेरचा राहील. सदरचा निर्णय सामान्य बहुमताने घेतला जाईल.

(४) निवडणुकीस उभ्या असलेल्या उमेदवाराची यादी १ आठवडा अगोदर चिटणीस नोटीस फलकावर जाहिर करतील.

(५) निवडणुकी पूर्वी १५ दिवस अगोदर मंडळाच्या सूचना फलकावर निवडणुकीची तारीख, वेळ, जागा जाहीर केली जाईल. व मतदारास तसे कळविण्यात येईल.

(६) निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने ( मतपत्रिकाव्दारे ) होईल. प्रत्येक मतदारास एक मत देता येईल.

(७) निवडणुकीच्या मतदानानंतर एक तासाने मतमोजणी सुरू होऊन निकाल जाहिर केला जाईल.

१४. वादात धर्मादाय आयुक्तांचा संदर्भ :-

जर घटनेत कोणत्याही पोट कलमाचा किंवा तरतुदीचा अर्थबोध होत नसेल या वेळी स्पष्टीकरण करतांना वाद निर्माण झाल्यास ती बाब धर्मादाय आयुक्त यांचेकडे विचारार्थ पाठविता येईल. आणि त्यां निकाल हा अखेरचा राहील.

१५. मंडळाचा निधी व मालमत्ता :-

(१) मंडळाची सर्व मालमत्ता व निधी मंडळाच्या सामुदायीक मालकीची राहील. त्यावर कोणत्याही सभासदाचा वैयक्तीक मालकी हक्क राहणार नाही.

(२) मंडळाचा मालमत्तेसंबंधी कार्याच्या व्यवहारास अध्यक्ष व चिटणीस यांच्या सह्या राहतील. व सदरचा व्यवहार विश्वस्तांच्या सल्ल्यानुसार केला जाईल.

(३) मंडळाचा मालमत्तेचे रजिस्टर ठेवले जाऊन त्यात वेळोवेळी नोंदी करण्यात येतील.

१६. घटना दुरुस्ती :-

संस्थेच्या घटनेत कोणतीही दुरुस्ती सुचवावयाची असल्यास ती सभासद चालू वर्ष संपण्यापूर्वी किमान एक महिना अगोदर कार्यालयात लेखी पाठवावी. अशी दुरुस्ती विश्वस्त मंडळाने मंजूर केल्यास सदरची दुरुस्ती वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मांडण्यात येईल. अशी दुरुस्ती हजर सभासदांच्या २/३ मताने मंजूर झाल्यास घटनेत योग्य तो बदल करण्यात येईल.

१७. मंडळाचे विसर्जन :-

मंडळाचे विसर्जन सर्वसाधारण सभेने ठरविल्याप्रमाणे व सोसायटी नोंदणी कायदा १८६० च्या कलम १३ व १४ प्रमाणे संस्था बरखास्त (बंद) करण्यात येईल. व तसेच संस्था बरखास्त करावयाची झाल्यास त्याच उद्देशांच्या सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० खाली नोंद - झालेल्या संस्थेमध्ये सदर संस्थेचा प्रॉपर्टी वर्ग करण्यात येईल.

१८. श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळ " या नावाची दुसरी संस्था गांवात नाही.

१९. सदरची नियमावली ही सत्य व बरोबर आहे.

डा. शि. आव्हाड — ना. स. नागरे

अध्यक्ष. उपाध्यक्ष. चिटणीस.

श्री. ब्रम्हानंदस्वामी शिक्षण प्रसारक मंडळ दोडी बु.:: ता. सिन्नर जि. नाशिक

सत्यप्रत
अधीक्षक 24-7-17
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग नाशिक